**सं.फौ.खटला नं. ४१/२०२३.**

**निशाणी क्र. ७ खाली**

**<u>अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१.</u>**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : **सादीक हुसेन शेख** | | |
| माझे वय | : ३४ वर्षे | व्यवसाय | : ड्रायव्हींग |
| राहणार | : इंदीरा नगर कळंब | तालुका | : कळंब |
| जिल्हा | : उस्मानाबाद. | | |

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता बी. पी. शिवलकर यांचेमार्फत शपथेवर सुरु -</u>**

दि. १२/१०/२०२५ रोजी मला पोलीसंनी हावरगाव रोड, मोहेकर कॉलेजच्या बाजुला सुनिता संतोष काळे हिच्या घरी बोलवले होते. तेथे पोलीसांनी दारू पकडली होती. एक काळा लोखंडी ड्रम व एक निळा प्लास्टीक ड्रम मध्ये दारू होती. दोन्ही ड्रममधील दारू प्रत्येकी १८० मि.ली. च्या दोन बाटल्यांमध्ये वेगळी काढली. त्याला सिल केले. सिलवर माझ्या व दुसऱ्या पंचाच्या सह्या घेतल्या होत्या. दुसऱ्या पंचाचे नाव अनिस सलीम शेख होते. तेथे पोलीस अधिकारी व आरोपी हजर होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. त्याबाबत घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखवण्यात आला त्यावर मी वाचून सही केली होती. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **नि.क्र. ८** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधीज्ञ श्री. ए.सी. चोंदे यांचेकडून -</u>**

२. मी स्वत:ची गुडस कॅरीअर गाडी चालवतो व ती भाड्याने देखील देतो. आमच्या गाडीचा थांबा मोंड्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रोज सकाळी ०८ वाजता जातो व रात्री ०९-१० वाजता वापस येतो. मी फोनवर भाडे असल्यास गाडी घेवून जातो.

३. मी कळंब येथील रहीवासी आहे. आरोपी इंदीरानगरचे रहीवासी नाही. आरोपी माझ्या घरापासून ३००-४०० मीटरवर राहते. आमच्या गल्लीमध्ये एक पारधी कुटुंबाचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गल्लीमध्ये चोऱ्या होत होत्या.

४. हे म्हणणे खरे आहे की, कारवाई करणारे पोलीस माझ्या ओळखीचे नव्हते व माझे पोलीसांसोबत बोलणे झाले नव्हते. घटनास्थळाच्या चतु:सिमेच्या डाव्या बाजुला वेल्डींगचे दुकान, उजव्या बाजुला घर, पाठीमागे आरोपीचेच घर व समोरच्या बाजुला नगर परिषद शाळेचे मैदान आहे. माझी व आरोपीची ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेल्याचे व माझ्यासमोर आरोपीकडून मुद्देमाल जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामधील मी संपुर्ण घटना खोटी सांगितली आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KEDAR KISHOR CHAUDHARI

Digitally signed by KEDAR KISHOR CHAUDHARI
Date: 2026.07.23 15:56:49 +0530

दिनांक :- २३/०७/२०२६.

**( केदार के. चौधरी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कळंब